# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यगुप्तवार्ता विभागाच्या कोल्हापूर विभागीय कार्यालयासाठी कर्मचारी संख्या अपूरी असल्याबाबत

**(१) ८३७२ (०८-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य गुप्तवार्ता विभागाच्या कोल्हापूर विभागीय कार्यालयात सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्हयांसाठी फक्त ५० गुप्तचर कर्मचारी असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन जिल्हयांची लोकसंख्या सुमारे १ कोटी असून लोकसंख्येच्या दृष्टीने गुप्तचर कर्मचारी यांची संख्या खूप कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) तिन्ही जिल्हयाकरीता लोकसंख्येच्या दृष्टीने जिल्हयातील राजकीय, सामाजिक, जातीय व गुन्हेगारीच्या हालचालींची गुप्त माहिती गोळा करणे इ. कामाकरीता गुप्तचर अधिकारी व कर्मचा-यांची पदे योग्य प्रमाणात मंजूर करण्यात आलेली आहेत.

(३) बदलीने व पदोन्नतीने रिक्त झालेली पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मांडवा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील जेट्टीवरील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने नियोजित केलेली कुलकार सेवा रद्द करण्याबाबत

**(२) ३२०३३ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडवा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील प्रवासी जेट्टीवर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत नियोजित कुलकार सेवेच्या विरोधात मांडवा बंदर स्थानिक संघर्ष समिती व विक्रम मिनीडोअर चालक-मालक कल्याणकारी संस्था यांनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मांडवा बंदर येथे रस्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील महिला पोलीस निरीक्षकांना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी करण्यापासून वंचित ठेवण्यात येत असल्याबाबत

**(३) ५५९७१ (२३-०८-२०१६). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महिला पोलीस निरीक्षकांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत त्या पोलीस ठाण्याचा कारभार सांभाळण्यात कमी पडतील अशी कारणे देत गत अनेक वर्षापासून पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी (इनचार्जशिप) करण्यापासून महिला निरीक्षकांना वंचित ठेवण्यात आल्याने या महिला अधिकारी अद्यापही न्यायाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे महिला निरीक्षकांचे मनोबल खच्ची होत आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. राज्यातील पोलीस दलात कार्यरत पुरुष व महिला पोलीस निरीक्षक यांची संख्या अनुक्रमे २३३५ व १२७ इतकी आहे. आणि पोलीस ठाण्यात प्रभारी अधिका-यांची संख्या अनुक्रमे ७९७ व २१ इतकी आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील नागरिकांच्या सर्वांगीण नागरी विकासासाठी स्टार्ट अप धोरण प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(४) ५९५१५ (२९-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः विकसित, विकसनशील व अविकसित तसेच दुर्गम भागातील नागरिकांच्या सर्वांगीण नागरी विकासासाठी स्टार्ट अप धोरण प्रभावीपणे राबविण्याबाबतची मागणी स्थानिक रहिवाशी संघटना, लोकप्रतिनिधी तसेच स्थानीय रहिवाशी संघाच्या प्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), अतिरिक्त मुख्य सचिव (नगरविकास) संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त तथा संबधित नगरपालिका संचालनालयाचे आयुक्त यांच्याकडे दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मा.मुख्यमंत्री कार्यालय, मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे कार्यालय, नगर विकास विभाग यांचेकडे अशी मागणी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोसारी (जि.पुणे) येथील अय्यपा आपटो कॉलनी येथे बांधकामासाठी खोदण्यात आलेल्या खड्डयात बुडून दोन बालकांचा झालेला मृत्यु

**(५) ६०५६३ (२३-०८-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील भोसरी येथील अय्यपा आपटो कॉलनी येथे बांधकाम व्यावसायीकाने बांधकामासाठी खोदण्यात आलेल्या खड्डयात बुडून दोन बालकांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक २ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर बांधकाम व्यावसायीकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) श्री.सतिश सुरजभान बन्सल, रा.मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे यांचे भोसरी, पुणे येथे मंजूर प्लॅनप्रमाणे बांधकाम करण्यास ठेकेदार हनुमंत गोपाळ राठोड यांच्याशी करार केला होता. बांधकामाच्या शेजारी पाण्यासाठी खोदलेल्या खड्डयात तेथे कामास आलेल्या कामगाराची मुले दि.२.५.२०१६ रोजी सायं ४.३० ते ५.०० च्या सुमारास खड्डयात पडली व खड्डयातील

साठवून ठेवलेल्या पाण्यात त्यांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले. या खोदण्यात आलेल्या खड्डयाला सुरक्षा कंम्पाऊंड नव्हते. ठेकेदाराने बांधकाम करताना आवश्यक ती खबरदारी न घेतल्याने ठेकेदार, सुपरवायझर व मूळ मालक यांना अटक करून त्यांचे विरोधात गु.र.नं. १२८/१६ नुसार गुन्हा नोंदविला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील नरीमन पॉईंट-मरीन ड्राईव्ह परिसरातील सुरक्षा व्यवस्थेबाबत**

**(६) ६३०४१ (२३-०८-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नरीमन पॉईंट-मरीन ड्राईव्ह परिसर हा अतिसंवेदनशील पर्यटन स्थळ असून या विभागात अनधिकृत फेरीवाले, गर्दुल्ले आणि जलदगतीने व निष्काळजीपणाने दुचाकी वाहन चालविणाऱ्यामुळे स्थानिक रहिवाशी व पर्यटक यांना होत असलेल्या त्रासाबाबत तसेच सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनामार्फत पुरेशी पोलीसांची सुरक्षा व्यवस्था, पोलीसांची गस्त, पहारा व जागोजागी बीट चौकी नसल्याबाबतची बाब स्थानिक लोकप्रतिनीधी (कुलाबा) यांनी पोलीस आयुक्त यांना दिनांक ३ ऑक्टोंबर, २०१५ रोजी निवेदन देवून निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर पोलीस प्रशासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०४-२०१८) :** (१) होय, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.३.१०.२०१५ रोजी पोलीस आयुक्त, मुंबई यांना निवेदन दिले आहे.

(२) व (३) मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणेकडून स्थानिक रहिवाशी व पर्यटक यांना होत असलेल्या त्रासाबाबत तसेच चौपाटीच्या सुरक्षेचे दृष्टीने अनधिकृत फेरीवाले, गर्दुल्ले आणि जलद रितीने निष्काळजीपणे दुचाकी वाहन चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता व त्यांना आळा घालण्याकरिता दिवसा ३ अधिकारी व ४ अंमलदार तसेच रात्रौ २ अधिकारी व ३ अंमलदार सतत गस्तकामी नेमण्यात येतात. त्याचप्रमाणे एक का व सु. पथक दिवसा व रात्री गस्तकामी या परिसरात नेमण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे दहशतवादी विरोधी पथक व डिसेंक्शन पथक वेळोवेळी या परिसरात गस्त करीत असतात. तसेच मरीन ड्राईव्ह मोबाईल-१ दिवसां व रात्री या परिसरात सतत गस्त करीत असते.

मरीन ड्राईव्ह चौपाटी परिसरात फेरीवाले, गर्दुल्ले आणि जलद गतीने व निष्काळजीपणे दुचाकी वाहन चालविणाऱ्यांवर दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६

पर्यंतच्या कालावधीमध्ये कलम १०२ व म.पो.का. अन्वये ५५४ जणांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच या कालावधीमध्ये दुचाकी वाहनावर रात्री व दिवसा नाकाबंदी करून मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार ५४७३ जणांवर कारवाई करण्यात आलेल्या आहेत. तसेच या कालवधीत गर्दुल्ले (अंमली पदार्थ सेवनार्थी) यांच्यावर ३७ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. या प्रकारे वेळोवेळी फेरीवाले, गर्दुल्ले व जलद गतीने वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर पोलीसांकडून कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणात मेरिटाईम इन्स्टिट्युट उभारण्याबाबत**

**(७) ६५१३४ (१०-०१-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात मेरिटाईम इन्स्टिट्युट उभारण्यात येईल अशी घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी केली असून इंडियन मेरिटाईम युनिव्हर्सिटीचे उपकेंद्र मौजे जयगड, जि.रत्नागिरी येथे उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपकेंद्राचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे मा. मुख्यमंत्री यांनी माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ रोजी प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कार्यवाहीची सदयस्थिती काय आहे आणि उपकेंद्राचे काम केव्हा सुरू करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) मेसर्स जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लिमिटेड या कंपनीकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मेसर्स किटको या सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहरातील मौजे भादवड येथील आदिवासी पाडा क्रमांक ३ मधील बालशिक्षण सुधार केंद्रात चोरी झाल्याबाबत**

**(८) ६७७२९ (१६-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील मौजे भादवड येथील आदिवासी पाडा क्रमांक ३ मध्ये सुरु असलेल्या बालशिक्षण सुधार केंद्रात तीन वेळा चोरी होऊन सुमारे साडेदहा लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सुधार केंद्र आदिवासी, मागासवर्गीय, भटक्या, विमुक्त जाती जमाती, अपंग व बालमजुरांसाठी चालविले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात बालशिक्षण सुधार केंद्रातील गणवेश, वह्या, शालेय बॅग, कॅमेरा, डेटा मशिन, संगणक व इतर साहित्याच्या झालेल्या चोरीबाबत चौकशी करुन तातडीने कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा. मुख्यमंत्री व मा.गृह राज्यमंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार बालशिक्षण सुधार केंद्राचे झालेल्या नुकसानापोटी संस्थेला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील परिमंडळ २ भिवंडी अंतर्गत शांतीनगर पोलीस स्टेशन हद्दीत मौजे भादवड येथील आदिवासी पाडा क्र. ३ येथील बाल शिक्षण सुधार केंद्रात तीन वेळा चोरी झाली आहे. परंतु सदर तीनही चोरीच्या गुन्ह्यातील चोरीस गेलेली मालमत्ता एकूण रु.४१,०००/- आहे.

भिवंडी शहरातील मौजे भादवड येथील आदिवासी पाडा क्र. ३ येथे महाराष्ट्र चाईल्ड डेव्हलपमेंट लेबर वेल्फेअर ही अशासकीय संस्था कार्यरत असुन ती संस्था बालकांचे शिक्षण, आरोग्य व इतर बाबींसाठी काम करीत आहे. या संस्थेच्या कार्यालयातील सीसीटीव्ही व इतर साहीत्य चोरीला गेल्याबाबत गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदरची संस्था ही स्वयंसेवी संस्था असुन या संस्थेचा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेशी संबंध नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील परिमंडळ २ भिवंडी अंतर्गत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे १) गु.र.क्र. २७६/२०१४, भा.दं.वि. कलम ३८१ अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच, २) गु.र.क्र. ७९/२०१६, भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८० व ३) गु.र.क्र. २४२/२०१६, भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८०,३४ अन्वये दाखल गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील समुद्रकिनारे सुरक्षित करण्यासाठी मनोरे उभारुन दुर्घटना टाळण्यासाठी स्पीड बोटी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) ६७८२१ (११-०१-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील समुद्रकिनारे सुरक्षित करण्यासाठी मनोरे उभारुन दुर्घटना टाळण्यासाठी स्पीड बोटीची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०४-२०१८) :** (१) व (२) मुंबई शहराच्या सागरी किनारपट्टीच्या सुरक्षेकरिता २३ पोलीस बोटी उपलब्ध असून त्यापैकी ८-१० पोलीस बोटींद्वारे अहोरात्र सतर्क व सशस्त्र गस्त घालण्यात येते. तसेच त्यांचे मार्फत समुद्रातील बोटींची कागदपत्रे, तांडेल, खलाशी यांचे ओळखपत्र, स्मार्टकार्ड तसेच बोटीवरील वैध मालाची व सामानाची आणि वाहतुकीबाबतच्या कागदपत्रांची कसून तपासणी केली जाते.

तसेच प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली दि.१२/०९/२०१७ रोजी सागरी सुरक्षा संदर्भात पार पडलेल्या आढावा बैठकीत मनोरे उभारण्याकरिता पायलट प्रोजेक्ट म्हणून मार्वे बीच, मालवणी येथे मरीन ऑपरेशनल रूम उभारण्यात येणार असून त्याचा आराखडा व अंदाजपत्रक मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांकरिता निर्माण केलेल्या जिल्हास्तरीय कामवाटप समितीबाबत

**(१०) ८६४९५ (०४-०९-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने रोजगार व स्वयंरोजगारासाठी माहे ऑक्टोबर, २००० मध्ये जाहिर केलेल्या नविन धोरणानुसार रायगड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांनी एकुण ११४ सेवा सहकारी संस्था स्थापन केल्या असून या सोसायट्यांना विनानिविदा कामे मिळावित याकरिता जिल्हास्तरीय कामवाटप समिती स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने मागील पाच वर्षात केवळ एकच सभा घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-०४-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड येथे ऑगस्ट, २०१७ अखेर बेरोजगार उमेदवारांच्या एकूण ११३ सेवा सहकारी संस्थाची स्थापना झालेली आहे.

रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्र.इएसई-२००३ /प्र.क्र.१९१/ रोस्वरो-१, दिनांक ०१/०२/२००६ अन्वये बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाना जिल्ह्यातील उपलब्ध कामाचे पारदर्शक व न्यायनिष्ठरित्या वाटप व्हावे, याकरिता प्रत्येक जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखालील नियुक्त जिल्हास्तरीय कामवाटप समिती नुसार रायगड जिल्ह्यात कामवाटप समिती स्थापन झाली आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्ह्यातील विविध कार्यालये / आस्थापनांकडून कामे उपलब्ध झाल्यानंतर जिल्ह्यातील नोंदणीकृत सेवा सहकारी संस्थाना कामे वाटप करण्याकरिता समितीची बैठक आयोजित करण्यात येते. त्यानुसार आय.टी.आय. म्हसळा व आय. टी. आय. पनवेल या कार्यालयांकडून प्राप्त कामानुसार अनुक्रमे दिनांक ११/०१/२०१६ व दिनांक २८/०३/२०१६ रोजी कामवाटप समितीच्या दोन बैठका घेण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बारामती (जि.पुणे) येथील दोघा व्यापाऱ्यांनी गार्डी येथील (ता.खानापूर, जि.सांगली) द्राक्षबागायतदारांची फसवणुक केल्याबाबत**

**(११) ८८६१९ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती (जि.पुणे) येथील दोघा व्यापाऱ्यांनी गार्डी येथील (ता.खानापूर, जि.सांगली) ९ द्राक्षबागायतदारांची एकुण ९ लाख १२ हजार रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी तक्रार स्थानिक पोलीसांत दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१), (२) व (३) फिर्यादी व त्यांचे गावातील इतर ७ शेतकरी यांना मालाची काही रक्कम शेतकऱ्यांना देवून उर्वरीत रक्कम बँकखात्यात जमा करतो असे वारंवार सांगुन पैसे देण्यास टाळाटाळ करुन रु.९,१५,०००/- ची फसवणूक केल्या प्रकरणी विटा पोलीस ठाणे येथे दोन आरोपींविरुद्ध गु.र.नं.११३/२०१७ भादंविस कलम ४२०, ३४ प्रमाणे दि.१९/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात बनावट दूध तसेच दारूनिर्मीतीचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याबाबत**

**(१२) ९२२४० (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात बनावट दूध तसेच दारूनिर्मीतीचे मोठे रॅकेट गत अनेक वर्षापासून कार्यरत असून स्थानिक पोलीस प्रशासनासह राज्य उत्पादन शुल्क व अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने त्याची चौकशी गुप्तचर खात्यामार्फत करण्याची मागणी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान संबधित अधिकाऱ्यांकडे सामाजिक कार्यकर्त्यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणाची चौकशी गुप्तचर खात्याकडे वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

नेवासा तालुक्यात (जि.अहमदनगर) बनावट दूध तसेच दारूनिर्मीतीचे कोणतेही रॅकेट कार्यरत नसून त्याची चौकशी गुप्तचर खात्यामार्फत करण्याची कोणत्याही प्रकारची मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी गुप्तचर खात्याकडे वर्ग करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

दूध भेसळीस आळा बसावा व ग्राहकांना सुरक्षित दूध उपलब्ध व्हावे याकरीता नियमितपणे दूध संकलन, उत्पादन प्रक्रिया केंद्रे, वितरक व विक्रेते अशा सर्व स्तरावर दूधाचे नमुने घेण्याची कार्यवाही करण्यात येते. मानकांप्रमाणे नसलेल्या नमुन्यांप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात येते.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने माहे एप्रिल ते नोव्हे, २०१७ या कालावधीत नेवासा तालुक्यातील अवैध मद्याविरोधात एकूण १२२ केसेस नोंद केल्या असून ७३ आरोपींना अटक करून कारवाईत २ चारचाकी वाहनांसह रू.११,२६,३७०/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस घटकांमार्फत नेवासा तालुक्यात छुप्या मार्गाने चालणाऱ्या अवैध दारू धंदयांवर वेळोवेळी छापे टाकून त्यांचे समुळ उच्चाटन करण्यात आले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**येलदरी (ता.जिंतूर, जि.परभणी) या ठिकाणी संत महाराज मंडळीला झालेल्या मारहाणीचे प्रकरण**

**(१३) ९२४६१ (०४-०९-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येलदरी (ता.जिंतूर, जि.परभणी) या ठिकाणी दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी रस्त्यावरुन काही संत महाराज मंडळी गाडीतून प्रवास करीत असताना त्यांच्या गाडीचा धक्का लागून झेंडा खाली पडल्यामुळे त्या गावातील लोकांनी संत महाराज मंडळीला मारहाण करत असताना

पोलीस उपविभागीय अधिकारी श्री.अनिल कांबळे यांनी बघ्याची भुमिका घेतली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेजबाबदार पोलीस अधिकारी यांना त्वरीत निलंबित करण्याबाबत नागरीकांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पोलीस अधिकारी यांना निलंबित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) दि. २५.०१.१७ रोजी मा.खासदार श्री.संजय जाधव व वारकरी मंडळी यांच्या स्वाक्षरीचे निवेदन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात आलेले आहे. सदर निवेदनात उप विभागीय पोलीस अधिकारी अनिल कांबळे यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे. मा.मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाची अपर पोलीस अधीक्षक परभणी यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून उप विभागीय पोलीस अधिकारी श्री.अनिल कांबळे यांनी कर्तव्य बजावतांना कसुर केला नसल्याचे निष्पन्न झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड येथील आयटीआय वसतीगृह ईमारतीची झालेली दूरवस्था**

**(१४) ९२५३१ (०४-०९-२०१७). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील आयटीआय वसतीगृहाची दूरवस्था झाली असून आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नूकसान होत असून विद्यार्थ्यांत तीव्र असंतोष पसरलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर वसतीगृहाची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०४-२०१८) :** (१) औद्योगिक प्रशिक्षण संस्था,बीड येथील वसतीगृह इमारतीचे बांधकाम १९८६ मध्ये झालेले असून काही ठिकाणी पाणी गळती होत आहे, काही ठिकाणी भिंतीचे प्लास्टर पडलेले आहे, तसेच शौचालयाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तथापि विद्यार्थ्यांकडून कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नसून विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला नाही.
(२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड येथील वसतीगृहाच्या इमारतीच्या नुतनीकरणाच्या कामाबाबतची आवश्यक कार्यवाही संस्थास्तरावर यापूर्वीच सुरु करण्यात आलेली असल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बीड येथील वसतीगृहाची इमारत तळ मजला अधिक तीन मजल्याची असून प्रवेशक्षमता २२० इतकी आहे. सध्या वाहतुकीच्या सोयी वाढल्याने फक्त ३० प्रशिक्षणार्थी सदर वसतिगृहामध्ये प्रवेशित असून त्यांची व्यवस्था एकाच मजल्यावर करण्यांत आली आहे व त्यांना आवश्यक सुविधा पुरविण्यांत आल्या आहेत. सन २०१७-१८ साठी जिल्हा नियोजन समितीकडून वसतीगृह बांधकाम व सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत रुपये १०.०० लाख मंजूर असून पहिल्या टप्प्यात एका मजल्यावरील शौचालय नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता व निधी वाटपासाठीचा प्रस्ताव जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, बीड यांच्या दिनांक २९.०९.२०१७ च्या पत्रान्वये जिल्हा नियोजन समितीला सादर करण्यांत आला आहे. त्या करिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक प्राप्त करुन घेण्यांत आले आहे. सदर कामाची जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकीय मान्यता लवकरच प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे सन २०१८-१९ साठी जिल्हा योजनेतून रु.८०.०० लाखाची मागणी प्रारुप आराखडयांत करण्यांत आलेली असून निधी उपलब्धतेची कार्यवाही जिल्हा नियोजन समिती यांचे स्तरावर सुरु आहे.

---

## धरमतर (जि.रायगड) जवळील डोलवी येथील खाडीकिनारी जेएसडब्ल्यू कंपनीने खारफुटीची कत्तल करून जेट्टीचे बांधकाम केल्याबाबत

**(१५) ९५४६४ (०६-०१-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरमतर (जि.रायगड) जवळील डोलवी येथील खाडीकिनारी जेएसडब्ल्यू कंपनीने खारफुटीची कत्तल करून कोणतीही शासकीय यंत्रणा तसेच सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता जेट्टीचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून रितसर तक्रार करण्यात आल्यानंतर कंपनीवर गुन्हे दाखल करण्यात आले असून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग, जि. रायगड यांचेकडून तपास सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तपास पूर्ण झाला आहे काय आणि त्यानूसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१८) :** (१) नाही. धरमतर खाडीतील अस्तित्वातील जेट्टीचा विस्तार करण्यासाठी अतिरिक्त वॉटरफ्रन्ट मंजूर करण्यासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने मे.जेएसडब्ल्यू धरमतर पोर्ट प्रा.लि. या कपंनीशी दिनांक ३.१२.२०१४ रोजी करारनामा स्वाक्षांकित केला आहे. तसेच, कपंनीने अस्तित्वातील जेट्टीच्या विस्तारासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी आणि केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालय यांच्याकडून परवानग्या प्राप्त केल्या आहेत.

(२) होय.

(३) स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर आणि ठाणे शहरातील शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांना अवैध दारू विक्री व ड्रग्जची सवय लावणारे मोठे रॅकेट सक्रिय असल्याबाबत**

**(१६) ९५५३० (०६-०१-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर आणि ठाणे शहरातील शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांना अवैध दारू विक्री व ड्रग्जची सवय लावून त्यांच्या मार्फतीने हा व्यवसाय सुरू करून मोठे रॅकेट सक्रिय असल्याची गंभीर माहिती माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूरच्या एका पोलीस अधिकाऱ्याच्या सहाय्याने हा अवैध व्यवसाय चंद्रपूरात सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत आढळून आले व या सक्रीय असलेल्या रॅकेटच्या आरोपींवर कारवाई करण्याबाबत व तसेच सदरील प्रकार पुन्हा घडू नये म्हणुन उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हयात संपूर्ण दारुबंदी असल्याने लपून-छपून दारु विक्री करीत असल्याबाबत गोपनीय माहितीच्या आधारे व जनतेच्या सहकार्याने अवैध दारु विक्री किंवा ने-आण करणाऱ्यां विरुध्द पोलीसांमार्फत तात्काळ कार्यवाही करण्यात येते. शाळांमध्ये अंमली पदार्थांची अवैध विक्री तसेच अंमली पदार्थांचा महाविद्यालयातील युवकांमध्ये प्रसार होणार नाही यासाठी चंद्रपूर जिल्हा पोलीस दलातर्फे जनजागृती करण्यात आलेली आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांतर्फे अवैध दारुबाबत क्रॅक डाऊन सप्ताहात तसेच इतर वेळी दारु उत्पादक, दारुभट्या यांचेवर जास्तीत जास्त कारवाई करुन त्याचा समूळ नष्ट करण्याबाबत कारवाई केली जाते. तसेच अवैध अंमली पदार्थ विक्री व सेवनास प्रतिबंध करण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, अंमली पदार्थ गांजा, अफू, एमडी व इतर अंमली पदार्थांची विक्री, वाहतूक व साठवणूक करणाऱ्या इसमांविरुध्द वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१७ मध्ये आजपावेतो दारुबंदी तसेच एनडीपीएस या सदराखाली दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न झाले नाही. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील एकाही पोलीस ठाण्याला अशी तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निलंबित जेलर हिरालाल जाधव यांची चौकशी करण्याकरीता नेमलेल्या चौकशी समीतीचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(१७) ९८०३६ (०६-०१-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेलर हिरालाल जाधव ठाणे मध्यवर्ती कारागृहात अधिक्षक असताना कारागृहातील महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ केल्यामुळे त्यांना निलंबित करुन या प्रकरणाकरिता तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली असून या समितीने गत आठ महिन्यांपासून अद्याप कोणतीही चौकशी पूर्ण केलेली नसल्याची बाब दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने निलंबित जेलरच्या चौकशीसाठी दुस-यांदा मुदतवाढ घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१८) :** (१), (२) व (३) बाबत श्रीम.अश्वती दोरजे, अतिरिक्त पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या विभागीय चौकशी समितीने अहवाल शासनास सादर केला आहे. तथापि, श्री.हिरालाल जाधव, (निलंबित) अधिक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह यांनी समितीची वैधतेबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात सन्मा. सर्वाच्च न्यायालय येथे विशेष रजा याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरण सन्मा. सर्वाच्च न्यायालय येथे प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) येथील पऱ्हाड कोचिंग क्लासेसच्या शिक्षकाने विद्यार्थ्याला जबर मारहाण केल्याबाबत**

**(१८) ९८१९७ (०६-०१-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील पऱ्हाड कोचिंग क्लासेसच्या एका शिक्षकाने पिण्यास पाणी दिले नाही म्हणून एका विद्यार्थ्याला काठीने जबर मारहाण केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकांत कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, दोषी शिक्षकांवर व क्लास चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मेहकर येथील पऱ्हाड कोचींग क्लास मधील शिक्षकाने विद्यार्थ्यास मारहाण केल्याची घटना घडलेली नाही. सदर क्लासच्या शिक्षकाच्या चालकाने विद्यार्थ्यास मारहाण केल्याची घटना घडलेली आहे.

(२) शिक्षकाने केलेल्या तक्रारीस अनुसरुन त्याच्या चालका विरुध्द पोलीस स्टेशन मेहकर येथे अप.क्र.२९८/१७ कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) आरोपी विरुध्द दोषारोपत्र क्र.११८/१७ दि.३/११/२०१७ सीसीनं.२५८/१७ दि.४/११/२०१७ अन्वये न्यायालयात केस दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बँक ऑफ महाराष्ट्र च्या खामगाव (जि.बुलढाणा) येथील घारोड येथील ग्राहक सेवा केंद्र चालकांनी खातेदारांना लाखो रूपयांना फसविल्याबाबत**

**(१९) ९८२०५ (०६-०१-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बँक ऑफ महाराष्ट्र च्या खामगाव (जि.बुलढाणा) येथील घारोड येथील ग्राहक सेवा केंद्र चालकांनी खातेदारांना लाखो रूपयांना फसविल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा खामगांव, चा BCA एजंट, रा.घारोडा, ता.खामगाव याच्याविरुध्द फिर्यादीने केलेल्या तक्रारीस अनुसरुन पोलीस स्टेशन हिवरखेड येथे अप.क्र.१९१/२०१७ कलम ४२०, ४१८, ४०९, ४०३ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याच्या तपासात आरोपीस दि.२६/१०/२०१७ रोजी अटक करण्यात आली असून त्याचा रिमांड घेऊन गुन्ह्यात वापरलेले इलेक्ट्रॉनिक पॉस मशिन व इतर साहित्य जप्त केले आहे. सध्या आरोपी न्यायालयीन काठडीमध्ये आहे. गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांचे व्याज माफ करण्याबाबत**

**(२०) ९८३३० (२६-०२-२०१८). अ‍ॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून रू.१० लाख इतक्या मर्यादेपर्यंत कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांचे व्याज माफ करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत रु.१० लाख मर्यादेपर्यंत कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांचे महामंडळामार्फत व्याजही माफ करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२६-०४-२०१८) :**(१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या तीन जिल्ह्यांतील ११८९ गावांनी नक्षलवाद्यांना गावबंदी केली असल्याबाबत**

**(२१) ९८४५८ (०६-०१-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनासाठी गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या पूर्व विदर्भातील तीन जिल्ह्यांतील ११८९ गावांनी नक्षलवाद्यांना गावबंदी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सर्वाधिक १०३६ गावांचा समावेश आहे, तर चंद्रपूर ८० व गोंदिया जिल्ह्यातील ७३ गावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गावांना शासनाकडून कोणती मदत देण्यात आली व त्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. पूर्व विदर्भातील तीन जिल्ह्यातील १२०० गावांनी नक्षलवाद्यांना गावबंदी केली आहे. त्यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील १०४७, गोंदीया जिल्ह्यातील ७३ व चंद्रपूर जिल्ह्यातील ८० गावांचा समावेश आहे.

(३) नक्षलवाद्यांना गावबंदी केलेल्या गावांना शासन निर्णय क्र.ग्रापप्रो २००३/प्र.क्र.७१/कार्या १४ दि.३०.१०.२००३ नुसार रुपये २ लक्ष मदत देण्यात येत होती. त्यानंतर डिसेंबर,२००६ मध्ये शासन निर्णय क्र. ग्रापप्रो २००६/प्र.क्र.६१/कार्या १४ दि.२६.१२.२००६ नुसार ३ लक्ष ऐवढा निधी मदत देण्याची तरतूद केली आहे. गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या नक्षलग्रस्त जिल्ह्यातील नक्षलग्रत गावांमध्ये गावबंदी केलेल्या एकूण १२०० गावांपैकी १०२८ गावांसाठी २७,०३,००,०००/- निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वेकोली वणी (जि.चंद्रपूर) क्षेत्रातील एकमेव घुग्घूस क्षेत्रीय कार्यशाळेमधून किंमती सामग्रीची चोरी झाल्याबाबत

**(२२) ९८५१४ (०६-०१-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेकोली वणी (जि.चंद्रपूर) क्षेत्रातील एकमेव घुग्घूस क्षेत्रीय कार्यशाळेमधून काही अज्ञात चोरांनी दोन लाख रुपयांच्यावर किंमत असलेल्या महत्वाच्या सामग्रीची चोरी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चोरी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक ११/११/२०१७ चे ०३.०० वा दरम्यान एरीया वर्कशॉप वेकोली, घुग्घूस येथे ठेवलेले सामान २ नग हाऊजींगपॉवर १०० जिपीएम लोखंडाचे किंमत रु. १२,०००/-, १ नग स्टीलचा सॉप्ट ८० एमएम ६/८० किंमत रु.२,००,०००/-, १ नग एमएसबेल्ट ६ इंच लोखंडाचा किंमत रु.१५००/-, ६ नग लोखंडी एंगल किंमत रु.३६,००/- असा एकूण रु.२,१७,१००/-चा माल कोणीतरी अज्ञात आरोपींनी चोरुन नेला आहे अशी तक्रार दि.१२/११/२०१७ रोजी सिक्यूरिटी गार्डने दिली आहे. त्यावरुन पो.स्टे. घुग्घूस येथे अप.क्र.६६१/२०१७ कलम ३७९, ३४ भादवि अन्वये गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी ३ आरोपींना दि.१२/११/२०१७ रोजी व एका आरोपीस दि.१३/११/२०१७ रोजी अटक करण्यात आली व त्यांच्याकडून रु.२,१५,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाण्याच्या परीसरामधील दुर्गा मातेच्या मंदिरातील काचेची दानपेटी चोरीला गेल्याची घटना**

**(२३) ९८५२१ (०६-०१-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील पोलीस ठाण्याच्या परीसरातील झंझट निपटारा केंद्राच्या जागृत दुर्गा मातेच्या मंदिरातील काचेची दानपेटी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना माहे ऑक्टोंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चोरीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दि.३०/०९/२०१७ व १/१०/२०१७ च्या मध्यरात्री मंदिराची काचेच्या खिडकीचे इंटरलॉक उघडून दान पेटीतील ६ ते ७ हजार रुपये चोरीस गेल्याने पोलीस स्टेशन भद्रावती येथे अज्ञात आरोपी विरुध्द दि.१/१०/२०१७ रोजी अप.क्र.९४९/२०१७ कलम ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.सदर प्रकरणी चोरीची पार्श्वभूमी असलेल्या एका आरोपीने अन्य गुन्ह्याच्या तपासात मंदिरात चोरी केल्याचे कबुल केले. त्याच्याकडून रु.३,५००/ रोख रक्कम जप्त करण्यात आली. सदर आरोपीस न्यायालयाचे आदेशाने न्यायालयीन कोठडी रिमांड मध्ये जिल्हा कारागृह, चंद्रपूर येथे ठेवले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात चोऱ्या, खून, दरोडा, लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(२४) ९८८३६ (०६-०१-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून चोऱ्या, खून, दरोडा, लुटमारीच्या अनेक घटना घडल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलीसांकडून दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान १७ दिवसांत एकूण १५ चोऱ्या झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार चोरी, खून, दरोडा, लूटमारीच्या होणाऱ्या घटना रोखण्यासाठी व दोषींना लवकरात लवकर शिक्षा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) व (२) अकोला जिल्ह्यात माहे जानेवारी २०१७ सप्टेंबर २०१७ मध्ये माहे जानेवारी २०१६ ते सप्टेंबर २०१६ या तुलनात्मक काळापेक्षा चोरी या सदरात-३६ गुन्ह्यात घट झाली आहे. खुन या सदरात १ गुन्ह्याची घट झालेली आहे. लुटमारी (जबरी चोरी) या शिर्षकाखाली +०४ ने गुन्ह्यात अल्पशी वाढ झालेली आहे.

| माहे जानेवारी ते सप्टेंबर २०१६ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | गुन्हयाचा प्रकार | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | गेलेला मुद्देमाल (रु.) | वसूल मुद्देमाल (रु.) |
| १ | चोरी | ४५८ | १६५ | १३६८९१५ | ३९४४८९४ |
| २ | खून | २७ | २७ | --- | --- |
| ३ | दरोडा | ३ | ३ | ५१३०० | ५१०००० |
| ४ | लुटमारी | ४० | २३ | १९३४९४ | ५१२४५४ |

| माहे जानेवारी ते सप्टेंबर २०१७ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | गुन्हयाचा प्रकार | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | गेलेला मुद्देमाल (रु.) | वसूल मुद्देमाल (रु.) |
| १ | चोरी | ४२२ | १४६ | १९०९०८८ | ४५१२५४२ |
| २ | खून | २६ | २५ | --- | --- |
| ३ | दरोडा | ३ | ३ | ६५०० | ६५०० |
| ४ | लुटमारी | ४४ | २० | ५६९२६१४ | ३६८८०६ |

माहे सप्टेंबर २०१७ मध्ये एकूण ५९ चोरीच्या घटना घडल्या असून त्यापैकी १८ गुन्हे उघडकीस आणून ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांचेकडून चोरीस गेलेल्या माला पैकी ५,७०,८००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यांत आलेला आहे.

(३) चोरी, खून, दरोडा, लूटमारीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी एकूण १० अधिकारी व ६० कर्मचारी एकूण १७ पोलीस पेट्रोलिंग मोबाईल व्हॅन व २२ बिट मार्शल याव्दारे पेट्रोलींग करीत आहेत. विविध गुन्हयातील आरोपी विरुध्द सबळ पुरावे गोळाकरुन दोषींना लवकरात लवकर शिक्षा होण्याचे दृष्टीने विहित मुदतीत न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात येते.

माहे जानेवारी ते सप्टेंबर २०१७ मध्ये खालीलप्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यांत आलेली आहे.

कलम १०९ सीआरपीसी-१६३, कलम ११० सीआरपीसी-६१२, कलम १२२ मपोका-३६ व कलम ५५ ते ५७ मपोका-८८

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळोजा (जि.रायगड) येथील हायकेल लि.या कंपनीचे ॲग्रो केमिकल्सचे माल निर्यात करतेवेळी अपहार करणाऱ्यांना अटक झाल्याबाबत**

**(२५) ९८९११ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (जि.रायगड) येथील हायकेल लि. या कंपनीने ॲग्रो केमिकल्सचे सुमारे १ कोटी ६४ लाख रूपये किंमतीचे १८० बॉक्स सिनजेंटा क्रॉप कॉर्पो.लि. न्यूयॉर्क या कंपनीस जेएनपीटी येथून निर्यात करण्याकरिता ट्रान्सपोर्टद्वारे पाठविले असता मालाचा अपहार करणाऱ्यांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाचा अपहार करणाऱ्यांना अटक केल्यानंतर गुन्हे अन्वेषण शाखेने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सदर घटनेबाबत न्हावाशेवा पोलीस स्टेशन (नवी मुंबई) येथे गु. र.नं.७९/२०१७ भादंविसं कलम ४०७, ४६५, ४६८, ४७१, ३४ सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३(१)(II) ३(२), ३(४) अन्वये गुन्हा दाखल असून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) आरोपींनी गुन्हा केल्याबाबत पुरावे मिळून आल्याने मा.न्यायालय, अलिबाग येथे मोक्का स्पेशल केस नंबर०४/२०१७, दि.१८/१२/२०१७ अन्वये दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे, नंदुरबार माथाडी मंडळात लेखापाल पदावर बनावट दस्ताऐवजाद्वारे नियुक्ती केल्याबाबत**

**(२६) ९८९७१ (०६-०१-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे, नंदुरबार माथाडी मंडळात लेखापाल पदावर शादिर कुरेशी याची नियुक्ती खोट्या दस्तऐवजाच्या आधारे करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पोलीस स्थानकात तक्रार नोंदविण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१२-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
तथापि, श्री.कुरेशी यांची नियुक्ती ही विहित भरती प्रक्रिया राबवून झालेली नाही. या नियुक्तीबाबत निवेदन/तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे खरे आहे.
(२) व (३) श्री.शादीर कुरेशी यांच्या नियुक्तीबाबत प्राप्त झालेल्या निवेदन / तक्रारीच्या अनुषंगाने कामगार आयुक्त यांनी, त्यांना पदावरुन सेवामुक्त किंवा बडतर्फ करुन त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्याचे प्रस्ताविले आहे. कामगार आयुक्तांनी प्रस्ताविलेली कार्यवाही, विहित कार्यपध्दतीचा व नियमांचा अवलंब करुन करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाळुंगे एमआयडीसी (ता.खेड, जि.पुणे) मध्ये नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत**

**(२७) ९९२३९ (०६-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाळुंगे एमआयडीसी (ता.खेड, जि.पुणे) मध्ये असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या, तेथील कामगार, निरनिराळ्या भागातून आलेल्या अनेक लोकांचे वाढते वास्तव्य आदींमुळे भांडण, चोऱ्या, दरोडे, खून यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास केलेल्या मागणीच्या अनुषंगाने चाकण पोलीस ठाणेचे विभाजन करून नवीन म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत व त्याकरिता विविध संवर्गातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची एकूण ६२ पदे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने नवीन म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे मंजुरी तसेच कर्मचारी भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) प्रस्तावित म्हाळुंगे एमआयडीसी (ता.खेड, जि.पुणे) पोलीस ठाणेअंर्तगत सन २०१६ च्या तुलनेत सन २०१७ मध्ये चोरी, दुखापत या गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे तथापि खुनाच्या गुन्ह्यामध्ये घट झालेली आहे. तसेच सन २०१७ मध्ये दरोड्याचा ०१ गुन्हा घडलेला आहे.

(२) व (३) राज्य पोलीस दलामधील पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्याच्या प्रस्तावामध्ये पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील चाकण पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे निर्माण करण्याची बाब समाविष्ट करण्यात आली आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद यांनी चोरी प्रकरणी कोणतीही कारवाई न केल्याबाबत.**

**(२८) ९९८७२ (०६-०१-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.विक्रम सुर्यवंशी (रा.सांजा, ता.जि.उस्मानाबाद) यांनी त्यांच्या शेतातील सोयाबीनचे पीक गावातील काही गुंड व्यक्ती चोरुन नेत असल्याची तक्रार पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. विक्रम सुर्यवंशी यांनी तक्रार करुनही पोलीस निरीक्षक, आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद यांनी कोणतीही फिर्याद दाखल करुन घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी श्री.विक्रम सुर्यवंशी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, उस्मानाबाद यांचेकडे तक्रार केली, त्यावर पोलीस अधिक्षक यांनी या प्रकरणी फिर्याद नोंदविण्याचे आदेश देऊन देखील आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबादचे पोलीस निरीक्षक यांनी फिर्याद नोंदवून घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.विक्रम सुर्यवंशी यांनी तद्नंतर आय.जी. औरंगाबाद यांचेकडे तक्रार केल्यानंतर आनंदनगर पोलीस स्टेशन, उस्मानाबाद मध्ये फिर्याद नोंद केली परंतु सदर फिर्यादीमध्ये जाणीवपुर्वक त्रुटी ठेवल्यामुळे नवीन तपास अधिकारी नेमून सुधारीत कलमासह फिर्याद नोंद करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणात पोलीस निरीक्षक, आनंदनगर पोलीस स्टेशन यांनी हलगर्जीपणा केल्याबद्दल त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दि.२४/१०/२०१७ रोजी दिलेल्या फिर्यादीच्या अनुषंगाने आनंदनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २४४/२०१७ भा.दं.वि. कलम ३७९, ४४७, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) सदर गुन्ह्याच्या तपासात फिर्यादी यांनी दिलेली फिर्याद खोटी स्वरुपाची असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्याचा 'ब' वर्ग अहवाल मा. प्रथमवर्ग न्यायालय, उस्मानाबाद येथे दाखल करण्यात आलेला आहे.

(५) सदर प्रकरणात पोलीस निरीक्षक, आनंदनगर पोलीस स्टेशन यांनी हलगर्जीपणा केल्याचे दिसून आलेला नाही.
(६) विलंब झालेला नाही.

---

**देगलूर (जि.नांदेड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीच्या हस्तांतरणाबाबत**

**(२९) १००१४६ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उदयोजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलूर (जि.नांदेड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे बांधकाम सन २०१६ मध्ये पूर्ण होऊन सदर इमारतीचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे हस्तांतर झाले आहे काय,
(२) असल्यास, केव्हा हस्तांतर करण्यात आले आहे,
(३) अद्यापी हस्तांतर झाले नसल्यास शासनाने या प्रकरणी चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०४-२०१८) :** (१) व (२) देगलूर, जिल्हा. नांदेड येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम सन २०१६ मध्ये पूर्ण झालेले आहे. तथापि सदर इमारतीचे हस्तांतरण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे अद्यापि झालेले नाही.
(३) देगलुर, (जिल्हा नांदेड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे बांधकाम सन २०१६ मध्ये पूर्ण झालेले आहे. तथापि, सद्यस्थितीत सदर इमारतीला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली नाही, विद्युतमीटर व विद्युत जोडणी अद्याप झालेली नाही, बांधकामातील इतर किरकोळ कामे जसे, खिडक्यांना काचा बसविणे, पुर्ण इमारतीस इलेक्ट्रीकल वायरींग करुन पंखे व टयुबलाईट बसविणे, अंतर्गत रस्ते इत्यादी कामे शिल्लक आहेत. तसेच प्रशिक्षणार्थ्याच्या इतर सुविधा अपुर्ण आहेत. सदर कामे पूर्ण करुन इमारत हस्तांतरीत करणे बाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर, जि.नांदेड यांच्याकडे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) देगलुर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरिता जेथे नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले त्याठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या आवारामध्ये तेलंगना राज्य इलेक्ट्रिसीटी बोर्डाचे हाय व्होल्टेज इलेक्ट्रीकलचे पाच पोल होते, जे या संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणावेळी घातक ठरले असते. त्यामुळे तेलंगना राज्य इलेक्ट्रीसीटी बोर्डाकडे सतत पाठपुरावा केल्यानंतर या पोलवरील हायटेन्शन वायर्स माहे ऑक्टोबर २०१७ अखेर काढण्यांत आल्या असून आता केवळ पोल उभे असून ते सुध्दा लवकरच काढण्यात येणार आहेत. या कारणामुळे तसेच वरील प्रश्न भाग क्रमांक-३ मध्ये नमूद केलेली कामे अद्यापि पूर्ण व्हावयाची असल्यामुळे सदर इमारतीचे हस्तांतरण अद्यापि झालेले नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या वतीने ९०० सुरक्षा रक्षकांची भरती खाजगी ठेकेदारामार्फत करण्यात आल्याबाबत

**(३०) १००३५९ (०१-०१-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जिल्हा खाजगी सुरक्षारक्षक मंडळाच्या वतीने शासकीय अस्थापनेला आवश्यक सुरक्षा रक्षकांची भरती महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक आधिनियम सन १९८१ अन्वये बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या वतीने ९०० सुरक्षा रक्षकांची भरती खाजगी ठेकेदाराच्यामार्फत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमबाह्यरित्या केलेल्या भरतीबाबत महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आघाडीच्या वतीने लेखी तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मदतनिसांना सुरक्षा रक्षकाची कामे दिली जातात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खाजगी ठेकेदार कंपन्याकडून मदतनीस व सुरक्षा रक्षकांना किमान वेतन कायदा प्रमाणे वेतन देण्यात येत नाही तसेच कामगार कायद्याप्रमाणे कोणतेही सुविधा देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर खाजगी ठेकेदारावर व नियमबाह्य भरती करणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०५-०४-२०१८) :** (१) शासन निर्णय (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग) क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, दि.८.११.२००६ अन्वये सरकारी/निमसरकारी क्षेत्रे/उपक्रम/शासकीय मंडळे/सहकारी संस्था/शासकीय कार्यालय इत्यादी ठिकाणी शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणेबाबत तसेच माजी सैनिकांची सुरक्षा रक्षक म्हणून सुरक्षा रक्षक मंडळामध्ये प्राथम्याने नेमणुक करणेबाबतची तरतूद विहित करण्यात आली आहे.

(२) पुणे महानगरपालिकेतर्फे खाजगी ठेकेदारास सुरक्षा विभागातील सुरक्षा रक्षकांच्या मदतीकरिता ९०० सुरक्षा रक्षक मदतनीस पुरविण्याचे काम देण्यात आले आहे.

(३) प्रमुख संघटक, पुणे जिल्हा महाराष्ट्र सुरक्षा रक्षक आघाडी यांनी दि २९/९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या नेमणुकीबाबत तक्रार केली आहे हे खरे आहे. पुणे महानगरपालिका व्यवस्थापनाने कळविल्यानुसार महानगरपालिकेने सुरक्षा रक्षकांची भरती केली नाही. सदर भरती संबंधित सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करणा-या संस्थेने / अभिकरणाने त्यांच्या अधिकारात केली आहे.

(४) होय, खरे आहे.

(५) व (६) सरकारी कामगार अधिकारी, पुणे यांनी तपासणी करुन कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० चा भंग केल्याबाबत पुणे महानगर पालिकेस व वेतन प्रधान अधिनियम, १९३६, कंपनी कामगार अधिनियम, १९७०, समान वेतन अधिनियम १९७६, महाराष्ट्र वर्क्समेन

मिनीमम हाऊस रेंट अलाउन्सेस १९८३ या अधिनियमाचा भंग केल्याबाबत मे.सैनिक इंटेलिजन्स प्रा.लि.या एजन्सीला दि २६/२/२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली असून याबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वडकी परीसरामध्ये (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) अवैध धंदे सुरू असल्याबाबत

**(३१) १००५६९ (०६-०१-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडकी परीसरामध्ये (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) आजुबाजला १० ते १५ खेडे असून तेथील लोकांची वडकी येथे वर्दळ होत असून अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे या परिसरात अवैध धंदे व ऑनलाईन लॉटरीच्या नावावर वरली मटका जुगार सर्रास सुरू असल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर तसेच पोलीस अधिकारी दोषी आढळल्यास त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
यतवमाळ जिल्हयातील वडकी परिसरात कोणतेही अवैध धंदे सुरु नसून लपून छपून सुरु असलेल्या अवैध दारु व्यवसायांवर पोलीसांनी माहिती काढून त्या आधारे प्रचलीत कायद्यान्वये संबंधीताविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. अवैध व्यवसायाकडे पोलीसाकडून कोणतेही दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.
सन २०१७ मध्ये अवैध दारु व जुगार संदर्भात खालीलप्रमाणे केसेस दाखल केल्या आहेत.

| अ.क्र. | प्रकार | एकूण केसेस | एकूण आरोपी | एकूण दोषारोपपत्र दाखल | पोलीस प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारुबंदी | १४५ | १५१ | ११४ | ३१ |
| २ | जुगार | २० | ४० | १८ | २ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात जातीय हिंसाचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्याबाबत

**(३२) १००८५२ (०६-०१-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील तीन वर्षात जातीय हिंसाचारांच्या २७० घटना घडल्या असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६ मध्ये ६८, सन २०१५ मध्ये ६८, सन २०१४ मध्ये ९७ जातीय हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील या जातीय हिंसाचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०४-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्यात मागील तीन वर्षात जातीय हिंसाचाराच्या घटनेच्या अनुषंगाने सन २०१६ मध्ये ५७, २०१५ मध्ये ८०, व २०१४ मध्ये ७६ असे एकूण २१३ गुन्हे दाखल आहेत.
(३) राज्यात जातीय सलोखा राखण्याबाबत मार्गदर्शक सुचना व जातीय सलोखा हाताळण्याच्या कार्यपध्दतीबाबत राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी परिपत्रकान्वये सुचना निर्गमित केल्या आहेत. तसेच पोलीस मित्र समितीच्या बैठका घेऊन जातीय सलोखा राखण्याबाबत सर्व संबंधीतांना परिपत्रकान्वये सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राधानगरी व भुदरगड तालुक्यामध्ये (जि.कोल्हापूर) प्रामुख्याने राशिवडे बुद्रुक व पिंपळगाव बु. येथे पोलीस स्टेशन आऊट पोस्ट करण्याबाबत

**(३३) १०१०१५ (०६-०१-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी व भुदरगड तालुक्यामध्ये (जि.कोल्हापूर) प्रामुख्याने राशिवडे बुद्रुक व पिंपळगाव बु. येथे पोलीस स्टेशन आऊट पोस्ट करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व राज्यमंत्री, गृह यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्रानुसार दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राधानगरी व भुदरगड हे दुर्गम व डोंगराळ तालुके असून पोलीस आऊट पोस्ट होणे गरजेचे असल्याने सदरहु ठिकांणी आऊट पोस्ट होणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २२.०८.२०१७ च्या निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून माहिती प्राप्त होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपुर जिल्ह्यातील बुटीबोरी येथील एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन परिसरातील व बेला पोलीस स्टेशन परिसरातील अवैध धंद्याबाबत**

**(३४) १०१०७७ (०६-०१-२०१८). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुर जिल्ह्यातील बुटीबोरी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन परिसरातील औद्योगीक परिसर व बेला पोलीस स्टेशन परिसरात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरात जागोजागी मोठ्या प्रमाणावर सट्टा केंद्र, अवैध दारु विक्री, लाखोंच्या उलाढाली यांमुळे स्थानीक पोलीसांसह डी.वाय.एस.पी. बुटीबोरी यांचीही चौकशी करण्यात येणार आहे काय,
(३) तसेच संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अवैध धंदे चालविण्या-यांवर तसेच दोषी पोलीस कर्मचारी/अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०४-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि काही वृत्तपत्रात प्रसिध्द बातमीच्या आधारे संबंधीत अधिकाऱ्यांना उचित कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

माहे ऑक्टोबर २०१६ अखेर दारुबंदी या सदराखाली २४६ गुन्हे दाखल झाले तर रु.३२,३६,३३३/- इतक्या किंमतीचा माल जप्त झाला. तर माहे ऑक्टोबर २०१७ अखेर ३७२ गुन्हे दाखल झाले तर रु.१,१७,०९,९८७/- इतक्या किंमतीचा माल जप्त झाला. २०१७ मध्ये अवैध व्यवसायाविरोधात वेळोवेळी प्रभावी विशेष मोहिम राबवून कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांविरोधात चौकशी प्रस्तावित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फुलसावंगी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे पोलीस चौकी सुरू करण्याबाबत**

**(३५) १०२१०८ (०६-०१-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलसावंगी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे पोलिस चौकी सुरू करण्याबाबत माहे मार्च, २०१७ पासून स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार मा.गृहराज्यमंत्री (ग्रामीण) यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे,
(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांच्या आस्थापनेवरील उपलब्ध मनुष्यबळातून फुलसावंगी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथे कायमस्वरुपी पोलीस चौकी निर्माण केली असून त्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज मिळण्याबाबत

**(३६) १०२४४९ (१०-०१-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात बीज भांडवल योजनेअंतर्गत ८० लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ लाख रुपये कर्ज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्षभराचा कालावधी लोटूनही संबंधित कार्यालयाला हे उद्दिष्ट्य पार करता आलेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर लाभार्थ्यांना कर्जपुरवठा करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी व सामाजिक संघटनेने शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी लाभार्थ्यांना कर्जपुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१६-०४-२०१८) :** (१) हे खरे नाही.
संपूर्ण महाराष्ट्रासाठी ४००० चे उद्दिष्ट्य देण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्राप्त प्रकरणांची तपासणी झालेनंतर तात्काळ कार्यवाही करुन कर्ज वाटप केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील भूकंपग्रस्त नागरिकांच्या समस्यांबाबत

**(३७) १०२४५८ (२१-१२-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात दिनांक ३० सप्टेंबर, १९९३ रोजी आलेल्या भूकंपातील भूकंपग्रस्तांना मिळालेल्या घरांचे मालकी हक्क (कंबाला), वारसा हस्तांतरण, खरेदी-विक्री अधिकार व इतर निगडित व्यवहार जिल्हाधिकारी स्तरावर असल्याने सदर लाभार्थ्यांना विविध गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी एका निर्णयाद्वारे सदर प्रक्रियेसंदर्भात तहसील व ग्रामपंचायत स्तरावर अधिकार प्रदान केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील भूकंपग्रस्त नागरिकांच्या घरांचे मालकी हक्क हस्तांतरण, कबाले नोंदी, खरेदी-विक्री आदी प्रक्रियांचे अधिकार तहसील व ग्रामपंचायत स्तरावर प्रदान करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुशंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०४-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) याप्रकरणी जिल्हाधिकारी लातूर यांनी तहसिल व ग्रामपंचायत स्तरावर अधिकार प्रदान केल्याची बाब तपासून उस्मानाबाद जिल्ह्याबाबत आवश्यक तो निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## फुलंब्री (जि.औरंगाबाद) या तालुक्यातील वडोदबाजार येथून शासकीय वितरण प्रणालीचे तांदूळ काळ्या बाजारात विक्री करीत असल्याबाबत

**(३८) १०२६९० (०६-०१-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) या तालुक्यातील वडोदबाजार येथून शासकीय वितरण प्रणालीचे ७ टन ५ क्विंटल तांदूळ काळ्या बाजारात नेत असताना सिल्लोड ग्रामीण पोलीसांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच भविष्यात पुढे शासकीय धान्य अशाप्रकारे काळ्या बाजारात विक्री होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी दि.२६.०९.२०१७ रोजी सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३८७/२०१७ अत्यावश्यक वस्तु कायदा अधिनियम १९९५ चे कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण ३ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून तांदुळ व इतर साहित्य असा एकूण ७,३४,७२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, अशा प्रकारचे शासकीय धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असल्याची माहिती प्राप्त होताच संबंधितावर गुन्हे दाखल करुन कार्यवाही करण्यात येते.
(३) विलंब झालेला नाही.

---

## शासकिय सेवेतील तात्पुरती पदोन्नती व तांत्रिक खंडाबाबत

**(३९) १०३०३५ (०६-०१-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनात कायमस्वरूपी पदोन्नती न देता ११ महिन्याकरीता देण्यात येणा-या तात्पुरत्या पदोन्नतीचा कालावधी समाप्त झाल्यावर आयोगाची मान्यता मिळाली नसल्यास एक किंवा दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पदावनत करण्याचे शासन धोरण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक खंड देऊन पदावनत केल्यानंतरच्या कालावधीत लोकसेवा आयोगाकडून निवडसूचीस मान्यता प्राप्त झाल्यामुळे तांत्रिक खंडाच्या कालावधीचे वेतन निश्चितीचे आदेश निर्गमित केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, तांत्रिक खंड क्षमापित केल्याचे आदेश निर्गमित केल्यानंतर तांत्रिक खंडाच्या कालावधीची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(४) नसल्यास, तांत्रिक खंडाचे व वेतन निश्चितीचे आदेश निर्गमित केले जात नसल्यास संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, तांत्रिक खंड देऊन पदावनत केल्यानंतरच्या कालावधीत लोकसेवा आयोगाकडून निवडसूचीस मान्यता प्राप्त झाल्यामुळे तांत्रिक खंडाच्या कालावधीचे वेतननिश्चितीचे आदेश निर्गमित केले जात नाहीत. कारण तांत्रिक खंडाच्या कालावधीकरीता संबंधित कर्मचारी हा पदावनतीच्या पदावर असल्याने त्या कर्मचाऱ्याचे वेतन हे म.ना.से.(वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्रमांक १२ नुसार अदा होणे अपेक्षित असते.
(३) तात्पुरती सेवा नियमित करण्याबाबत आदेश झाल्यास संबंधितांची तात्पुरत्या खंडाचा कालावधी नियमित झाल्याने त्याची तात्पुरत्या खंडाची सेवा ही वेतन निश्चितीच्या प्रयोजनासाठी शासन परिपत्रक वित्त विभाग दि.०५.१२.१९८५ व शासन शुध्दीपत्रक दि.२४.०२.१९८६ नुसार विचारात घेतली जाते.

(४) तात्पुरत्या पदोन्नतीमधील खंडाचा कालावधी नियमित झाल्यास संबंधित कर्मचाऱ्याने वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.०५.१२.१९८५ व शासन शुध्दीपत्रक दि.२४.०२.१९८६ मधील दिलेल्या विकल्पानुसार त्यांची वेतन निश्चिती, वेतन निश्चितीचे आदेश निर्गमित करुन केली जाते. त्यामुळे कोणाविरुध्दही कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही.

---

**वणी व झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(४०) १०३२८७ (०६-०१-२०१८). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी व झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारु विक्री, कोंबडीबाजार व अवैध वाहतुक सुरु असुनही पोलीस प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असुन पोलीस यास संरक्षण देत असल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात अवैध व्यवसायामध्ये अनेक जन गुंतल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत, हे ही खरे आहेत काय,

(३) असल्यास, सदर अवैध व्यवसायांस पाठिंबा देणा-यांवर तसेच अवैध व्यवसायांवर प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०४-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील वणी व झरी तालुक्यात कोणतेही अवैध धंदे सुरु नसून लपून छपून सुरु असलेल्या अवैध दारु व्यवसाय, कोंबड बाजार व अवैध प्रवासी वाहतुकीवर पोलीसांनी माहिती काढून त्या आधारे कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. सन २०१७ मध्ये सदर दोन तालुक्यात दारुबंदी कायद्यान्वये ६७९ केसेस उघडकीस आणून ७२२ आरोपींकडून १,६९,८८,३०९ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच कोंबड बाजारावर रेड करुन ४ गुन्हे उघडकीस आणून १७ आरोपींना अटक करुन ८,८३,२१० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे १३९३ अवैध प्रवासी वाहतुकीच्या केसेस करण्यात आलेल्या आहेत.

अवैध व्यवसायाला पोलीसांकडून कोणतेही संरक्षण देण्यात आलेले नाही.

(३) अवैध दारुचा व्यवसाय करणाऱ्यां विरुध्द सन २०१७ मध्ये कलम ९३ मुंबई दारुबंदी कायद्यान्वये १०२ प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे, अवैध जुगार व्यवसाय करणाऱ्या विरुध्द कलम ११० सिआरपीसी अन्वये ११३ प्रतिबंधक केसेस करण्यात आल्या आहेत त्याचप्रमाणे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परवाने निलंबनाची कारवाईसाठी ३५ प्रस्ताव संबंधीतांकडे पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजगुरुनगर (ता.खेड,जि. रत्नागिरी) येथील जिल्हा न्यायालय इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४१) १०३३६८ (०६-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (ता.खेड, जि. रत्नागिरी) येथील जिल्हा न्यायालय इमारतीला तडे गेले असून निचरावाहनी (ड्रेनेज लाईन) नादुरुस्त असल्याने दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत दुरुस्त करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने राजगुरुनगर येथील जिल्हा न्यायालय इमारतीच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०१८) :** (१) राजगुरुनगर ता. खेड येथील जिल्हा न्यायालयाची इमारत ही रत्नागिरी जिल्ह्यामध्ये येत नाही. राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे येथील न्यायालयाच्या आवरातील ड्रेनेज लाईन नादुरुस्त आहे हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, पुणे यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि. १९ सप्टेंबर, २०१६ नुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांनी दि. ६.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील पोलीसांच्या गुन्हे शाखेच्या प्रमुखांनी मोटार वाहन चोरी, सोनसाखळी व जबरी चोरी व दरोडा विरोधी कक्ष बंद केलेबाबत**

**(४२) १०५२९३ (०७-०४-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पोलीसांच्या गुन्हे शाखेच्या प्रमुखांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मोटार वाहन चोरी, सोनसाखळी व जबरी चोरी व दरोडा विरोधी कक्ष बंद केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, हे विभाग बंद केले असल्यामुळे पर्यायी कोणती व्यवस्था निर्माण करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मोटार वाहन चोरी, सोनसाखळी व जबरी चोरी व दरोडा विरोधी कक्ष बंद करण्यात आले नसुन त्याची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(२) व (३) मोटार वाहन चोरी, सोनसाखळी व जबरी चोरी व दरोडा विरोधी कक्ष हे तीनही कक्ष मालमत्ता कक्षा अंतर्गत कार्यरत आहेत. तसेच, त्यांची कामे ही मालमत्तेच्या गुन्ह्यांशी संबंधित असल्याने प्रशासकीय सोयीसाठी वेगळे न ठेवता मालमत्ता कक्षा अंतर्गत कार्यरत करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसाची गोळवली येथील जमीन बळकावल्याचे प्रकरण**

**(४३) १०५६१५ (१२-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसाची गोळवली येथील जमीन बळकावल्याप्रकरणी दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मानपाडा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु. र. क्र. ७२०/२०१७, भा.दं.वि. कलम ४२०, ४४७, ४६५, ४६८, ४७१ सह अनु. जाती व अनु. जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ सुधारीत अधिनियम २०१५ चे कलम ३(१)(f) प्रमाणे गुन्हा दाख़ल करण्यात आला आहे.

नमुद गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने सदर जागेची मोजणी करुन अहवाल मिळण्याकरिता भुमी अभिलेख कार्यालय, कल्याण यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्यांचेकडुन सदर जागेची निश्चिती करुन तसेच फिर्यादी यांचेकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने अधिक चौकशी करुन पुढील तपास करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासन सेवेतील वर्ग ४ सवंर्गातील पदवीधर नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती मिळत नसल्याबाबत**

**(४४) १०७१२२ (०६-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन सेवेतील वर्ग ४ संवर्गातील पदवीधर नसणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिनांक ६ जुन, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये लिपिक टंकलेखक पदावर पदोन्नती देता येणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई मधील शासकीय कार्यालयामधील अनुकंपातत्वावरील सेवा जेष्ठता यादीतील उमेदवारांसाठी तसेच ज्या कार्यालयांनी स्वतंत्र सेवा प्रेवश नियम तयार केलेले आहेत, त्यांना सदरचा शासन निर्णय लागू नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शासन निर्णयामुळे यापूर्वीच्या पदवीधर नसणाऱ्या वर्ग ४ कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) व (२) शासन अधिसूचना दि. ०६.०६.२०१७ अन्वये बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील “लिपिक-टंकलेखक”, गट-क या पदावरील भरतीकरिता सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत. या सेवाप्रवेश नियमानुसार गट-ड मधील पद धारण करणाऱ्या उमेदवारांकरिता लिपिक-टंकलेखक या पदावरील पदोन्नतीसाठी “पदवी” ही शैक्षणिक अर्हता विहित करण्यात आली आहे.

शासन अधिसूचना दि. २१.०२.२०१८ अन्वये बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील “लिपिक-टंकलेखक”, गट-क या पदावरील भरतीकरिता सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत. या सेवाप्रवेश नियमांनुसार देखील गट-ड मधील पद धारण करणाऱ्या उमेदवारांकरिता लिपिक-टंकलेखक या पदावरील पदोन्नतीसाठी “पदवी” ही शैक्षणिक अर्हता विहित करण्यात आली आहे.

या दोन्ही सेवाप्रवेश नियमांव्दारे असे विहित करण्यात आले आहे की, सदर सेवाप्रवेश नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापूर्वी अनुकंपा तत्वाव्दारे नियुक्तीसाठी प्रतिक्षायादीत असलेल्या उमेदवारांना “पदवी” ही अर्हता लागू होणार नाही. मात्र, सदर दोन्ही सेवाप्रवेश नियम शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अनुकंपा तत्वाव्दारे नियुक्तीसाठी प्रतिक्षायादीत नाव नोंदविण्याकरीता “पदवी” हीच शैक्षणिक अर्हता लागू असेल. तसेच या दोन्ही सेवाप्रवेश नियमांत अशीही तरतूद करण्यात आली आहे की, ज्या शासकीय कार्यालयांनी लिपिक-टंकलेखक, गट-क या पदाचे सेवाप्रवेश नियम स्वतंत्ररित्या अधिसूचित केले आहेत, त्या कार्यालयांकरिता उक्त दोन्ही सेवाप्रवेश नियम लागू असणार नाहीत,

(३) व (४) "बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "लिपिक-टंकलेखक", गट-क (सेवाप्रवेश) नियम २०१७" प्रसिध्द होण्यापूर्वी बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक, गट-क पदावरील भरती "बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "लिपिक-टंकलेखक", गट-क (सेवाप्रवेश) नियम १९९३" नुसार करण्यात येत होती.

सन १९९३ च्या नियमांचा बदलत्या काळानुसार तसेच बदलत्या प्रशासकीय गरजांनुसार आढावा घेणे आवश्यक होते. त्यानुसार "बृहन्मुंबईबाहेरील शासकीय कार्यालयातील "लिपिक-टंकलेखक", गट-क (सेवाप्रवेश) नियम २०१७" विहित करण्यात आले असून, त्यामध्ये शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचे प्रमाण आणि इतर संबंधित अर्हता याबाबतीत नवीन तरतूदी समाविष्ट करण्यात आल्या असून, गट-ड मधून लिपिक-टंकलेखक पदावरील पदोन्नतीकरिता "पदवी" ही शैक्षणिक अर्हता विहित करण्यात आली आहे,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील पोलीस विभागात कार्यरत असलेला हवालदाराने फसवणुक करुन सात महिलांसोबत लग्न केल्याबाबत

**(४५) १०८०८९ (१२-०४-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील पोलीस विभागात कार्यरत असलेला हवालदार सुर्यकांत काशीनाथ कदम याने फसवणुक करुन सात महिलांसोबत लग्न केले असुन चौकशीअंती ते सत्य असल्याचे आढळुन आले आहे असे मुंबई परमंडळ ३ चे उपायुक्त संजय शिंदे यांनी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे पोलीस असल्याचा फायदा घेवुन अनेकांची फसवणुक करणाऱ्या सदर हवालदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस नाईक सुर्यकांत कदम यांना दि. ०५.०१.२०१८ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच, त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील "क" वर्ग कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीविषयी विधी व न्याय विभागाने दिलेला सल्ला

**(४६) ११०४८५ (१९-०४-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने "क" वर्ग कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात काढलेला दिनांक २५ मे २०१४ रोजीचा शासन निर्णय रद्द करुन मा.उच्च न्यायालयाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या निकालाद्वारे पदोन्नतीतील आरक्षण रद्द केल्याचे मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ च्या निर्णयास १२ आठवड्याची स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित न केल्याने खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात कोणतीही वैधानिक अडचण निर्माण होणार नाही असा सल्ला विधी व न्याय विभागाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधी व न्याय विभागाने दिलेल्या उपरोक्त सल्ल्यानुसार शासन खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात १२ आठवडयात अपिल न करण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) होय.

(२) होय, विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने पदोन्नतीच्या कोट्यातील केवळ खुल्या प्रवर्गातील रिक्त जागा सेवाजेष्ठतेनुसार भरण्याच्या सूचना दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर पदोन्नत्या देताना जेष्ठतेनुसार पात्र असणा-या खुल्या प्रवर्गातील तसेच ज्यांना दि. २५.५.२००४ नंतर आरक्षणाअंतर्गत पदोन्नती मिळालेली नाही, अशा मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना देखिल पदोन्नत्या देण्यात येत आहेत.

(३) व (४) उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ रोजीच्या आदेशाविरुध्द राज्य शासनाच्या वतीने १२ आठवडयाच्या आत दिनांक १३.१०.२०१७ रोजी विहित मुदतीत मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे विलंब झालेला नसल्याने जबाबदार अधिका-यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) शहर व परसिरात चोरी व चैन स्नॅचिंगच्या घटना घडत असल्याबाबत

**(४७) १११०९८ (१२-०४-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली शहर व परसिरात चोरी व चैन स्नॅचिंगच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती रसिलाबेन गाला यांच्या गळ्यातील २ तोळे ७ ग्रॅम वजनाचा हार शनिवार, दिनांक ७ मे, २०१६ रोजी रात्री ११.१५ वा अज्ञात दुचाकीस्वार चोरांनी चोरल्याची

घटना घडली. त्यानंतर सदर घटनेबाबत टिळकनगर पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे एफआयआर (एफआयआर क्र.l ६८/१६) नोंदविण्यात आला आहे सदर घटनेस दिड वर्षांहून अधिक कालावधी होवूनही चोरांना पकडण्यास पोलीसांना यश आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तपास होणेबाबत व सदरहू चोरांना पकडून वृध्द महिलेला तिचे दागिने मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी श्रीमती रसिलाबेन गाला यांच्या गळ्यातील हार चोरी झाल्याबाबत टिळकनगर पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे गु.र.क्र. ६८/२०१६, भा.दं.वि. कलम ३९४, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्याचा सखोल तपास केला असता आरोपीबाबत काहीएक माहिती उपलब्ध न झाल्याने सदर गुन्हा मा. न्यायालयाने “अ वर्ग समरी” मंजुर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोर्ट शुल्कामधील वाढीव दर मागे घेण्याबाबत**

**(४८) ११३२५२ (१८-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये कायदा दुरुस्ती करून कोर्ट शुल्कामध्ये मोठी वाढ केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोर्ट शुल्क कायद्यामध्ये करण्यात आलेल्या शुल्क वाढीच्या विरोधात अनेक वकील संघटना तसेच नागरिकांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, या दरवाढीच्या निषेधार्थ सोलापूर बार असोशिएशन दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहून निषेध व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व सामान्य नागरिकांना आधीच न्याय मिळविणे महाग झाले असताना कोर्ट शुल्क वाढीच्या माध्यमातून महसूल जमविण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, राज्य शासनाने नागरिकांचे हित लक्षात घेऊन कोर्ट शुल्कामधील वाढीव दर मागे घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१८) :** (१) महाराष्ट्र न्यायालय शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०१७ अन्वये न्यायालयीन शुल्कात वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) सदर शुल्कवाढीच्या विरोधात औरंगाबाद वकील संघटनेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (स्टॅम्प) क्र.२३०३/२०१८, दाखल केली आहे, हे खरे आहे.

(३) या विभागाच्या अभिलेखावरून सोलापूर बार असोसिएशनने दि.२५.०१.२०१८ रोजी न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहून निषेध व्यक्त करणार असल्याचे निवेदन या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) मागील १५ वर्षाच्या कालावधीत झालेल्या रुपयाचे अवमूल्यन व महागाई लक्षात घेता फार पूर्वीपासून प्रचलित असलेल्या शुल्कामध्ये न्यायदानाची सेवा पुरविणे कठिण झाले होते, याकरिता शुल्कवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(५) महाराष्ट्र न्यायालय फी (सुधारणा) अधिनियम, २०१७ च्या कलम १ (२) अन्वये अधिनियम अंमलात आणण्याबाबतची अधिसूचना अद्याप निर्गमित करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## भिवंडीतील (जि.ठाणे) केनपार्क हॉटेलमध्ये गोळीबार करणारा सुरेश पुजारी टोळीचा शुटर हा अल्पवयीन असल्याबाबत

**(४९) ११४२२९ (१२-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भिवंडी-कल्याण मार्गावरील रांजणोली बायपास नाका येथील के.एन.पार्क हॉटेलमध्ये दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास गोळीबार झाल्याने जखमींवर कोनगाव येथील वेद हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, गोळीबार करणारा सुरेश पुजारी टोळीचा शुटर हा अल्पवयीन असल्याचे त्याच्या शाळेच्या दाखल्यावरुन स्पष्ट झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या तिस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई व ठाण्यातील व्यवसायिकांची यादी तयार करुन अल्पवयीन मुलांकडून दहशत निर्माण केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, सदर गुन्ह्यांनूसार आतापर्यंत किती जणांना अटक केली आहे, तसेच त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी नमुद गुन्ह्यातील सुरेश पुजारी टोळीचा शुटर नुर मोहम्मद दिन मोहम्मद खान हा अल्पवयीन असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मात्र, मुंबई व ठाण्यातील व्यावसायिकांची यादी तयार करुन त्यांना खंडणी साठी धमकावुन दहशत निर्माण करण्याचे काम त्याचे साथीदार आरोपींनी केल्याचे तपासात निष्पन्न होत आहे.

(४) होय. सदर प्रकरणी कोनगाव पोलीस स्टेशन, ता. भिवंडी येथे गु.र.क्र. ०६/२०१८, भा. दं. वि. कलम ३०७, ३८५, ३८७, ४५८, ३४, १२०(ब), २१० सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अक्ट ७ सह म.पो.का. कायदा कलम ३७(१), १३५ व आर्म अक्ट कलम ३, २५, १(क) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(५) नमुद गुन्ह्यातील ८ आरोपीना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हा तपासाधीन आहे.

---

**गोकूळनगर (ठाणे) येथे सदनिका खरेदी व्यवहारात झालेली फसवणूक**

**(५०) ११५५८२ (१२-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती शितल मळेकर रा.गिरगांव, मुंबई यांची प्लॅट क्रमांक ११/बी, सतगुरु अपार्टमेंट, गोकूळनगर, ठाणे (पश्चिम) या जागेच्या खरेदी व्यवहारात श्री.सुनिल मारुती पळसकर, अभियंता, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका या जागा मालकाने ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी श्रीमती शितल मळेकर यांनी राबोडी पोलीस स्टेशन (जि.ठाणे) येथे रीतसर तक्रार दाखल केली असून त्यानुषंगाने याप्रकरणी एफआयआरही दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त एफआयआर घेण्यास स्थानिक पोलीसांनी १ वर्षाचा विलंब म्हणजेच दिनांक २८ मे, २०१६ रोजी घेण्यात आली असून उक्त प्रकरणी पोलीस आयुक्त ठाणे यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणास ३ वर्षाचा कालावधी होत आला असून झालेला व्यवहार व केलेली फसवणूक पारदर्शक असूनही दोषींवर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आरोपीला जाणीवपूर्वक पाठीशी घालणाऱ्या राबोडी पोलीस स्टेशनच्या संबंधित पोलीसांवर तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (नियम व अपिल) अन्वये श्री.सुनिल मारुती पळसकर यांचेवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करुन त्यांना भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या सेवेतून विनावेतन निलंबित करण्यासह फसवणूकीत त्यांची साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी व इतर दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी राबोडी पोलीस स्टेशन येथे केलेल्या तक्रारी अर्जाच्या चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, यातील फिर्यादी यांनी पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडे तक्रार अर्ज न करता तो राबोडी पोलीस स्टेशन येथे केला होता.

(४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी चौकशीअंती फिर्यादी श्रीमती मळेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राबोडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १४३/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन  सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(५) उक्त प्रकरणी केलेल्या तक्रारी अर्जाच्या चौकशीअंती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सबब, राबोडी पोलीस स्टेशनचे संबंधित पोलीसांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणी भिवंडी-निजामपुर महानगरपालिका यांचेमार्फत आरोपी सुनिल पळसकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

आरोपी व त्यांची पत्नी यांचेत मतभेद असुन तिने आरोपीविरुध्द कौटुंबिक हिंसाचार अंतर्गत तक्रार केलेली होती. सदर केसमध्ये दिलेल्या निकालात आरोपीच्या पत्नीस प्लॅट क्रमांक ११/बी, सतगुरु अपार्टमेंट, गोकूळनगर, ठाणे या वादग्रस्त खोलीमध्ये राहण्याची परवानगी दिली आहे. नमुद फसवणुकीच्या गुन्ह्यात आरोपीच्या पत्नीचा कोणताही सहभाग दिसुन न आल्याने त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**